। ब्राह्मण कुटुंबातील प्रत्येक व्यक्तिच्या उन्नतीसाठी एक प्रभावी माध्यम ।

ॐ प्रकाशन

ब्राह्मण व्यावसायिक पत्रिका

BRAHMAN BUSINESS JOURNAL

■ पुणे ■ सप्टेंबर २०१८ ■ वर्ष १४ – अंक ९ ■ किंमत रु. ५०/– ■ पृष्ठसंख्या ५६ ■ मुख्य संपादक : गोविंद हर्डीकर

Interact

# वैदिक गणित

## एक उत्तम व्यवसाय....




आजची परिस्थिती बघितली तर लक्षात येते की मोबाइल, व्हॉट्सअॅप, फेसबुकच्या जगात विद्यार्थी वर्ग हरवला आहे. त्याचा परिणाम म्हणजे शाळेतील अभ्यासात लक्ष लागत नाही. मुख्यत्वेकरून गणिताविषयी जिज्ञासा निर्माण होत नाही आणि मग गणित म्हणजे काहीतरी विचित्र अवघड आहे, असे वाटू लागते. पण या परिस्थितीवर मात करण्यासाठी समाजातील सुशिक्षित तरुण पिढीने पुढाकार घेणे आवश्यक आहे.



विजय कुलकर्णी
९६०४५५५१९३

मागील लेखात आपण हे वैदिक गणित कोण कोण शिकू शकतं व त्याचा त्यांना आयुष्यात काय उपयोग होऊ शकतो, हे पाहिले. आता एक उत्तम व्यवसाय म्हणूनही या वैदिक गणिताकडे कसे बघता येईल? त्याविषयी आपण जरा सविस्तर चर्चा करू.

**प्रश्न : वैदिक गणिताचा व्यवसाय का करावा?**

वैदिक गणितामुळे आपण निश्चितच यशस्वी विद्यार्थी घडवू शकतो. यामध्ये नुसतेच अर्थाजन नाही, तर मुलांना गणित मनोरंजनातून शिकवण्याचा आनंद मिळतो. ते सामधान अव्यक्तच असते.

**प्रश्न : वैदिक गणिताचे क्लासस कोण घेऊ शकतात?**

सुशिक्षित गृहिणी, अनुभवी शिक्षक, तसेच बीएडचे विद्यार्थी, एमएससी मॅथ्स व इतर अनेक क्षेत्रातील व्यक्ती वैदिक गणिताचे क्लासेस सुरू करू शकतात.

**प्रश्न : हा व्यवसाय सुरू करण्यासाठी काय आवश्यक आहे?**

सर्वप्रथम या व्यवसायात उतरण्यासाठी गणिताची मुलभूत आवड असणे, मुलांना त्यांच्या कलेने शिकवण्याची नस माहिती असणे आवश्यक आहे. तसेच आपण या वैदिक गणिताद्वारे उत्तम पिढी घडवून आपले अर्थार्जन वाढवू शकतो, याचा आत्मविश्वास असणेही आवश्यक आहे.

**प्रश्न : वैदिक गणित व्यवसायात नक्की काय अडथळे येऊ शकतात?**

वास्तविक पाहता तसे अडथळे फारसे येत नाहीत, परंतु वैदिक गणित हा शालाबाह्य विषय असल्यामुळे वैदिक गणित म्हणजे नक्की काय हे पटवून देणे अतिशय आवश्यक असते. तसेच वैदिक गणिताविषयी समाजात असलेले गैरसमज हा अडथळा काही ठिकाणी असू शकतो.

**प्रश्न : वैदिक गणित हा व्यवसाय कसा सुरू करता येईल?**

सर्वप्रथम अनुभवी व तज्ज्ञ अशा संस्थेची फ्रँचायजी घ्यावी लागेल. त्यामार्फत वैदिक गणिताचे संपूर्ण मार्गदर्शन घ्यावे लागेल. तसेच व्यवसायासाठी लागणारे मार्केटिंगही समजून घ्यावे लागेल. मग संस्थेच्या मार्गदर्शनाखाली आपण हा व्यवसाय सुरू करू शकतो.

**प्रश्न : मला तुमची फ्रँचायजी कशी घेता येईल?**

नक्कीच, आमच्या ब्रह्मर्षी इन्स्टिट्यूटमधून वैदिक गणित शिक्षक कोर्स करून आपण आमची फ्रँचायजी घेऊ शकता. ब्रह्मर्षी इन्स्टिट्यूटमधून ४० दिवसांचा हा सर्टिफिकेट कोर्स आपल्यासाठी नेहमीच उपलब्ध आहे.

**प्रश्न : मग हे टीचर्स ट्रेनिंग कसे घ्यायचे?**

आपण हे टीचर्स ट्रेनिंग आमच्या इन्स्टिट्यूटमधूनही घेऊ शकता. अथवा स्काईपद्वारे ऑनलाइन कोर्स उपलब्ध आहे.

चला तर मग एक पाऊल व्यवसायाकडे....

अधिक माहितीसाठी आपण संपर्क साधू शकता–
विजय कुलकर्णी, डायरेक्टर व वैदिक मॅथ्स ट्रेनर,
ब्रह्मर्षी इन्स्टिट्यूट, कर्वेनगर, पुणे ४११ ०५२
vijaykulkarni15@yahoo.in

***



Om Prakashan
2nd Floor, Plot No. 8 Raghukul Society, Opp. Girijashankar Vihar, karve Nagar, Pune 411052
Contact No. 81490 90765 / 72767 00766, Email : patrika.bvp@gmail.com